ISBN NO. 978-81-924096-9-6

॥ आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः ॥

Sant Gadge Baba Amravati University Affilliated
Prabhu Shri Ramchandra Shikshan Prasarak Mandal Tondgaon Sanchalit

**Matoshri Shantabai Gote Arts, Commerce & Science College,**

Washim-444505 (MS)
NAAC Accredited With 'B' Grade

U.G.C. SPONSORED TWO DAYS INTERDISCIPLINARY
NATIONAL SEMINAR ON

# HUMAN RIGHTS EDUCATION

- EDITOR -

**Asst.Prof.G.S. Kubade**

Dept.of Economics
Matoshri Shantabai Gote Arts, Comm. & Sci. College
Washim Dist. Washim (M.S.)

U.G.C. SPONSORED TWO DAYS INTERDISCIPLINARY NATIONAL SEMINAR ON

# HUMAN RIGHTS EDUCATION

ISBN NO. 978-81-924096-9-6

- ORGANIZED BY -

Dept.of Economics
Matoshri Shantabai Gote Arts, Comm. & Sci. College
Washim Dist. Washim (M.S.)

- EDITOR -

Asst.Prof.G.S. Kubade

EDITOR BOARD

Asst.Prof.V.A.Gaikwad
Ass.Prof. D.N. Lanjewar
Asst.Prof. V.N. Lande

Dr.V.E.Dongaonkar
Asst.Prof.D.R.Damodar
Shri S.J.GOTE

| स.क्र. | विषय | लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| 60 | An Analysis of Right to Food in the Indian context | Dr. Usha N. Patil | 204 |
| 61 | HUMAN RIGHTS OF PERSONS SUFFERING FROM AIDS | Sushant D. Chimne | 210 |
| 62 | Assessment of Basic Human Rights of Self-employed Workers under Article 21 of Constitution of India | Dr. Suprabha P. Yadgirwar | 215 |
| 63 | JUDICIAL ACTIVISM IN PROTECTION OF RIGHT TO HEALTHY ENVIRONMENT IN INDIA | Prof. Sandeep C.Nagarale | 222 |
| 64 | Human Rights of Daily Rated Casual Labourers with special emphasis on their right to get regularised in the job- A Critique | Dr. Shrinaag A. Panchbhai | 226 |
| 65 | मानव विकास आर्थिक वृध्दीचे द्योतक | डॉ.संतोष नामदेवराव ताडे | 234 |
| 66 | मानवी हक्क : मानवी जीवनासाठी आवश्यक | माटे व्यंकटी गोविंदराव | 237 |
| 67 | मानव अधिकार आणि नव्वदनंतरच्या मराठी कवितेतील शेतकऱ्यांच्या व्यथांचे चित्रण | प्रा. विजय एम. जाधव | 239 |
| 68 | मानवी हक्क : शिक्षण | सुधिर ना. देशमुख | 244 |
| 69 | मानवी हक्काचे समताधिष्ठीत - मुल्य | प्रा.एन.आर.कनाके | 247 |
| 70 | आंबेडकरी साहित्यात मानवाधिकाराचे आविष्करण | डॉ. आर.पी. इंगळे | 249 |
| 71 | मानवाधिकार आणि समाज | सहा.प्रा.उन्मेश अजाबराव घुगे | 253 |
| 72 | शाहू महाराज आणि स्त्रीयांचे मानवाधिकार | प्रा. विनोद जे. राठोड | 255 |
| 73 | औद्योगिक क्रांती आणि मानवाधिकार | प्रा. भाऊराव रामेश्वर तनपुरे | 257 |
| 74 | मानवी हक्क व उच्च शैक्षणिक संस्थाची भूमिका | प्रा. पी.डी. शृंगारे | 261 |
| 75 | मानवी हक्क - आदिम म्होरकी - अनुबंध | प्रा.डॉ. अजय कृ. खडसे | 264 |
| 76 | पर्यावरणीय समस्या व मानवाधिकार | प्रा. दिलीप नि. लांजेवार | 269 |
| 77 | भारतीय संविधानामध्ये आदिवासी (अनुसूचित जमाती) चे मानवीय हक्क | सहा.प्रा.पूर्णिमा नारायण संधाणी | 272 |
| 78 | मानवी हक्कांच्या संवर्धन व संरक्षणात स्वयंसेवी संस्थांची भूमिका | प्रा. भालेराव जे.के., प्रा.सोडगे ता.प. | 276 |
| 79 | मानवी हक्क, शिक्षण | प्रा. एन.बी. महापती | 279 |
| 80 | पोलीस आणि मानवाधिकार | प्रा. दिपक राघोजी दाभोदर | 282 |
| 81 | भारतातील मानवी हक्क चळवळ एक अध्ययन | श्री संजय ज. गीते | 286 |
| 82 | मुक्ती संकल्पनेचे व्यावहारिक रूप : मानवाधिकार | प्रा. पुरूषोत्तम शं. वानखडे | 287 |


ISBN 978-81-924096-9-6

# पर्यावरणीय समस्या व मानवाधिकार

प्रा. दिलीप नि. लांजेवार
समन्वयक, मानवी हक्क अभ्यासक्रम
व भूगोल विभाग प्रमुख
मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, वाशिम

पृथ्वी पृष्ठावरील सर्व जीव परस्परावंर अवलंबुन आहेत. आपल्या विभिन्न गरजा भागविण्यासाठी जीवसृष्टी असलेल्या परावलंबनामुळेच प्राणिमाँाचे अस्तीत्व टिकुन आहे. प्रत्येक जीव परस्परावलंबी असुन ही तो आपण ...त्यात स्वंतं आहे. स्वातँय हा प्रत्येकाचा मुलभूत अधिकार आहे. मनुष्य देखिल आपले स्वतंत्र अस्तित्व राखण्या ...रच आपल्या व्यक्तीत्व विकासाची अपेक्षा ठेवतो. मनुष्याच्या स्वतँय आणि व्यक्तित्व विकासासाठी एका विशिष्ट ...स्थितीची निर्मिती आवश्यक असते त्याशिवाय त्याला आपल्या व्यक्तित्वाचा विकास करता येणार नाही. जोपर्यंत ...नुष्य स्वतःला निसर्गाचे एक अंग मानत होता तोपर्यंत पृथ्वीवर संतुलन टिकून होते. मात्र पुढे आपल्या बौद्धिक ...सामर्थ्याच्या आधारावर तो स्वतःला निसर्गाचा स्वामी समजू लागला. त्यातूनच त्याची वाटचाल भौतिक सुखसाधनांकडे होत गेली व अठराव्या शतकात औद्योगिक क्रांतीला सूरूवात झाली आणि मानवाने निसर्गातील साधनसंपत्तीचा अतोनात वापर सूरू केला व त्याचबरोबर उर्जासाधनांच्या ज्वलनाने निसर्गाचे संतुलन बिघडविले. त्यामुळे मोठया प्रमाणात पर्यावरणीय समस्या उदभवल्या. मानवाधिकाराच्या उल्लघंनास कारणीभूत ठरणाऱ्या घटकांमध्ये पर्यावरणीय समस्या एक महत्त्वाचा घटक आहे. एका व्यक्तिमुळे किंवा काही व्यक्तिमुळे पर्यावरणाचा मोठया प्रमाणात ऱ्हास घडून येतो व सर्वमानवजातीच्या जगण्याच्या अधिकाराला तडा बसतो त्यामुळे मानवाधिकारात पर्यावरण हा घटक सुद्धा महत्त्वाचा आहे.

**उद्दिष्टये :**

1) मानवाधिकार व पर्यावरणीय समस्याचा अभ्यास करणे.
2) पर्यावरण प्रदूषणाचा मानवीजीवनावर होणाऱ्या परिणामांचा अभ्याय करणे.
3) मानवाधिकार व पर्यावरणीय घटकांचा संबंध शोधणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तूत शोधनिबंधासाठी प्रामुख्याने दुय्यम स्वरूपाच्या सामुग्रीचा वापर करण्यात आला. यात वृत्तपत्रे मासिके, पुस्तके व इंटरनेट इ.

**पर्यावरणीय समस्या :**

पर्यावरण समतोल, पर्यावरणाची पूर्वस्थिती सध्याची स्थिती आणि भावी काळातील स्थिती याचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते की, पर्यावरणीय समस्या अधिक बिकट होत आहे. पर्यावरण आणखी बिघडणार नाही त्यासाठी काही निर्बंध घातले जावेत यादृष्टीने पर्यावरणविषयक कायदे करण्यात आले आहेत; पण तरीही मोठ्या प्रमाणात पर्यावरण ऱ्हासाचे चक्र सुरु आहे त्यावरून असे दिसून येते की, येत्या काही काळात मानवजातीसमोरील समस्या वाढतील.

**आर्थिक विकास आणि पर्यावरण :**

प्रत्येक व्यक्तिला चांगल्या मार्गाने आर्थिक उत्पन्न वाढविण्याचा अधिकार आहे; परंतु पर्यावरण आणि आर्थिक विकास यांचा अंर्तसंबंध नैसर्गिक साधनसंपत्ती हा विकासाचा प्रमुख स्रोत आहे. विकास म्हणजे वस्तू व सेवांचे

ISBN: 978-81-924096-9-6

उत्पादनात वाढ होणे होय. नैसर्गिक संधानाचा योग्य, पर्याप्त व कार्यक्षम वापरावर आर्थिक विकास ... असतो. केवळ नैसर्गिक संधानाची विपूलता असून त्यांचा वापर अयोग्य, अपूर्ण होत असेल तर, परिणामत: ... बेरोजगारी आणि मागासलेपणा या समस्या निर्माण होतात; पण आर्थिक विकास मात्र पर्यावरणासाठी ... आहे. कारण बहुतेक पर्यावरणीय प्रदूषण समस्या, पर्यावरण असंतूलन, नैसर्गिक संसाधनाचा अतिरिक्त ... वैश्विक तापमानवाढ हे विकासाचे दूष्परिणाम आहेत. मानवाने आपल्या स्वार्थासाठी मोठ्या प्रमाणात ... नैसर्गिक साधनांचा वापर केला, मात्र विकासाच्या प्रवाहात मानवाला एका गोष्टीचा विसर पडला ... भविष्यातील पिढीसाठी आपण या साधनसामुग्रीचे संवर्धन केले पाहिजे म्हणजेच पुढील पिढीच्या विकासा... जगण्याचा अधिकार व पर्यावरणाच्या उपभोगाच्या अधिकाराचे हनन होत आहे.

**पर्यावरणीय समस्येचे मानवावर होणारे परिणाम :**

आज सर्व जगाने सेवाक्षेत्रासह उद्योग क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे. भारतातही या सर्व बाबींचा ... अधिक झपाटयाने होत आहे मात्र त्याचबरोबर भारताची वाढती लोकसंख्या व भारतासमोरील पर्यावरण ... समस्या देखिल तेवढयाच वेगाने वाढत आहे; त्यामुळे भारतावर नैसर्गिक पर्यावरणीय ऱ्हासाचे गंभीर ... परिणाम दिसून येत आहेत.

**वैश्विक तापमानवाढ :**

वैश्विक तापमानवाढ म्हणजे जागतिक तापमानात झालेली वाढ होय. मानवी कृतीमुळे हवेतील कार्बनडाय... मिथेन व नायट्रेस आक्साईड या प्रमुख हरित वायुचे प्रमाण वाढल्यामुळे तापमानात दिवसेंदिवस वाढ होत ... तापमानातील या वाढीचे सर्व सजिव सृष्टीवर विपरीत परिणाम होतांना दिसून येत आहेत. याचबरोबर ... प्रदेशातील बर्फ वितळून उन्हाळयात देखिल पूरपरिस्थितीचा गंभीर प्रश्न निर्माण होत आहे, तसेच नद्या ... तलावांच्या क्षमतेत घट होणे व उन्हाळयात पूरपरिस्थिती निर्माण होणे हे परिणाम भविष्यात शेतीक्षेत्र घटत ... वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात उत्पादनात वाढ न झाल्यास उपासमारी यासारख्या समस्या मानवासमोर ... राहतील. जागतिक तापमानवाढीमुळे हवामान बदलाचा मानवी आरोग्यावर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम होत ... ज्याभागात अतिपाऊस पडतो तिथे साथीचे रोग पसरतात. गेल्या काही वर्षात दिंय रोगाचे जे प्रमाण वाढले ... त्याला काही अंशी ही जागतिक तापमान वाढ जबाबदार आहे. याप्रकारच्या पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे मानव... जगण्याच्या अधिकाराचे हनन होत आहे.

**वायूप्रदूषण :**

वायू जीवनदायी तत्त्व आहे. शद्ध वायू स्वस्थ जीवनाचा आधार आहे. प्रत्येक व्यक्ति साधारणपणे ... दिवसात 22000 वेळा श्वास घेतो व सोळा किलोग्रॅम वायूचा वापर करतो. वातारणात अनेक वायू असून ... नायट्रोजन 78.9 टक्के, ऑक्सीजन 20.95 टक्के, कार्बनडायक्साईड 0.03 टक्के तसेच ऑरगॉन, हेलियम, ... क्रेप्टॉन, ओझोन, हायड्रोजन इ. वायू विशिष्ट प्रमाणात मिसळलेले असतात व त्यांचा उपयोग मानव, ... पशूपक्षी, वनस्पती या सर्व जीवजंतू करतात. संतूलीत मात्रेत असणाऱ्या वायूला शूद्ध वायू म्हटले जाते या ... कायम करण्याकरिता निसर्ग स्वनियंत्रण आणि स्वशुद्धिकरण करण्याचे प्रयत्न करतो; परंतु जेव्हा बाह्य ... त्याज्य तत्त्व जास्त प्रमाणात वायूमध्ये मिसळले जाते किंवा वायूचा नैसर्गिक गुण नष्ट होतो अशा वायूला ... वायू म्हटले जाते.

वायूप्रदूषण आज मानवासहित अनेक जीवांकरिता संकट बनले आहे. ज्यापासून सूटका करणे कठीण ...

ISBN : 978-81-924096-9-6

गॅसीय प्रदूषक शरीरात गेल्याने अनेक रोगांची निर्मिती होते. कार्बनडायाक्साईड व कार्बनमोनाक्साईड यामुळे डोळे, डोके यांचे रोग होतात. बेन्झोपायरीन गॅसमुळे कर्करोगासारखा असाध्य रोग होतो. त्यामुळे एकप्रकारे ...च्या सुरक्षेच्या व जगण्याच्या अधिकारावर गदा येत आहे.

**...प्रदूषण :**

जल हे पर्यावरणाचे केवळ जीवनदायी तत्त्वच नाही तर जल हेच जीवन आहे. जलाविना कोणताही जीव ... राहू शकत नाही म्हणून परिस्थितीकीच्या निर्मितीमध्ये आधारभूत कारक आहे. मानव, वनस्पती व विश्वातील जीवजंतू आपल्या पोषक तत्त्वांची प्राप्ती जलाच्या माध्यमातून करतात. मानवी जीवन शुद्ध जलावर आधारीत ...त्यामुळे शुद्ध जल उपलब्ध असलेल्या ठिकाणीच मानवी वसाहत आढळते. मानवीशरीरात जवळपास 2/3 ... जलयुक्त असतो. ष रीरात पोषक तत्वांची निर्मिती, रक्तसंचार चयापचयक्रिया इ. जलावर आधारीत आहे. ...तील प्रदूषणाचा विचार केल्यास असे दिसून येते की, औद्योगिकरण व नागरिकरण झालेल्या क्षेत्रात जलप्रदूषण ... आहे. जलप्रदूषणाचा प्रवाह एवढा गंभीर झाला आहे की, लोक पाण्याविणा जगत आहेत. युरोपातील लोकांमध्ये ... दहशत निर्माण झाली आहे त्यामुळे ते पाणी पिण्याकरिता घाबरतात पाण्यात जास्त प्रदूषक मिसळल्यामुळे ते ...ऐवजी फळांचा रस, शितपेय, बियर, दूध इ. सेवन करतात. प्रदूषीत जलाच्या उपयोगामुळे अन्नाच्या ...पाला यामुळे मानवीशरीरात प्रदूषीत घटक जात आहेत. त्यामुळे गॅस्ट्रो, डायरिया, फ्लू इ. रोगामुळे मृत्यू होत ...हेत. जलप्रदूषणामुळे मानवाचा जगण्याचा हक्क हिरावला जात आहे.

**...ष्कर्ष :**

पर्यावरणीय ऱ्हास व मानवाने केलेली प्रगती यांचा जवळचा संबंध आहे. पर्यावरणीय ऱ्हासाचे परिणाम ...सह सर्वच विकसीत व विकसनशील राष्ट्रांना भोगावे लागत आहेत. पर्यावरणीय ऱ्हासाचा सर्वाधिक परिणाम ...तर सजीवसृष्टीवर अधिक होतांना दिसून येतो त्यामुळे एकूणच सजीवसृष्टीचे जीवन धोक्यात आले आहे. ... व सर्व सजीवसृष्टीस जो जगण्याचा व सुरक्षेचा अधिकार निसर्गाने बहाल केलेला आहे, तो अधिकार याळल्या ...षणामुळे काढून घेतला जात आहे. त्यासाठी पर्यावरणाची सुरक्षितता राखणे, पर्यावरणविषयक जनजागृती ...विणे व 'जगा व जगू द्या' तत्वाचा विचार करणे महत्त्वाचे आहे जेणेकरून पर्यावरण प्रदूषीत होणार नाही.

**...र्भ सुची :**


1. अभिजीत घोरपडे – गाथा पर्यावरणाची
2. डॉ. जयकुमार मगर – पर्यावरणशास्त्र परिचय
3. डॉ. सुभाश गवई व डॉ. दया पांडे – ओळख मानवाधिकाराची
4. वर्तमानपत्र / नियतकालीकातील प्रकाशीत लेख


□□□□□